विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ६३ / २०२६

नियमबाह्य वीज पुरवठा खंडोत करण्याबाबत

अनिल दत्तात्रय अंदे .... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, (महावितरण) रास्तापेठ .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अनिल दत्तात्रय अंदे

प्रतिवादी १ तर्फे :- १) राहूल पाटिल, कार्यकारी अभियंता, रास्तापेठ विभाग
२) किशोर शिंदे, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, रास्तापेठ उपविभाग
३) निलेश रोहनकर, अतिरीक्त कार्यकारी अभियंता रास्तापेठ विभाग

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १७ जुलै २०२६

आदेश पारित दिनांक :- ३१ ऑगष्ट २०२६

आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, पुणे परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक ११ मे २०२६ च्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १० जून २०२६ रोजी दाखल केले. मंचाने दिनांक १० मे २०२६ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी ग्राहकाची तक्रार अंशतः मंजूर केली. सदर आदेशात पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

"२. सामनेवाला यांना आदेश देण्यात येतो की, संबधिताना रक्कम रु.५०००/- दंड ५६(१) ची नोटीस न देता वीज पुरवठा बंद केल्याकारणाने मा. आयोगाकडे जमा करावेत.

३. सदर आदेश हा कार्यवाही केलेल्या विवेचनाला अधीन राहून त्यातील मुद्यांना बांधील राहील."

२. प्रतिवादी महावितरणने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १७ जुलै २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी अनिल दत्तात्रय अंदे, राहणार सर्व्हे नं ११०३/११०४ भवानी पेठ, अंदे वाडा, पुणे (ग्राहक क्रं.१७००११९६४१७९) महावितरणचे दिनांक १ जानेवारी १९७९ पासून घरगुती वीज ग्राहक आहेत. वीज जोडणीचा तपशील खालीलप्रमाणे.

Name of Consumer	Consumer No.	Address	Sanct. Load	Date of Supply	Billing Details			Outstanding Dues	Due Date	Disconnection Date
					Month	Units	Rs.			
Anil Dattatray Ande	170011964179	House No. 1103/1104, Bhavani Peth, Pin 411002	0.5 kW	01.01.1979	Feb-26	40	Rs .439/-	Rs .444/-	05.03.2026	18.03.2026
					Mar-26	48	Rs. 500/-	Current Bill	02.04.2026	After disconnection, Rs. 940/- paid on 18.03.2026.

(नोट : वीज पुरवठा दिनांक १८ मार्च २०२६ रोजी खंडीत करण्यात आलाः तथापि, १५ दिवसाची नोटीस सिस्टीमद्वारे देण्यात असल्याचे महावितरणने नमुद केले असल्याने तिची अंतिम मुदत दिनांक २० मार्च २०२६ होती).

- अपिलार्थी यांची माहे फेब्रुवारी २०२६ चे वीज देयक भरणा (रु.४३९/-) करण्याचा अंतिम दिनांक ५ मार्च २०२६ असतानाही त्याचा भरणा केला नाही, म्हणून सिस्टीमद्वार अपिलार्थींना नोंदणीकृत मोबाईलद्वारे सुधारीत थकबाकी रक्कम रु.४४४/- ची नोटीस कलम ५६(१) नुसार पाठविण्यात आली. (अशी रु.५००/- पेक्षा कमी थकबाकी असलेल्या ग्राहकाना थकबाकी भरणा करण्याची नोटीस त्या विभागातील अन्य ५० ग्राहकांना पाठविण्यात आली होती). तरीसुध्दा अपिलार्थीने सदर रक्कमेचा भरणा केला नाही. त्यामुळे अपिलार्थींचा वीज पुरवठा दिनांक १८ मार्च २०२६ रोजी खंडीत करण्यात आला. (आर्थिक वर्ष २०२५-२६ मार्च अखेर वीज देयक वसूली मोहीम) त्यावेळी मार्च २०२६ या महिन्याचे चालू वीज देयक रु.५००/- सुध्दा देण्यात आले होते. म्हणून अपिलार्थीने एकुण रु.९४०/- चा भरणा दिनांक १८ मार्च २०२६ रोजी भरणा केला. त्यानंतर दिनांक १८ मार्च २०२६ रोजी अपिलार्थींचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी व एएमआयएसपी (एजन्सी) चे

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

प्रतिनिधी स्मार्ट मीटरसह गेले असता, अपिलार्थीने स्मार्ट मीटरसह वीज पर्नजोडणी करून देण्यास विरोध केला. त्यानंतरही पुन्हा दुसऱ्या दिवशी दिनांक १९ मार्च २०२६ रोजी सुध्दा महावितरणचे कर्मचारी वीज जोडणी पर्नजोडणी करून देण्यास गेले असता अपिलार्थीने विरोध केला व प्रतिवादींना दमबाजी केली. त्यावेळी अपिलार्थीस स्मार्ट मीटर बसविण्याच्या धोरणाबाबतची सर्व माहीती देण्यात आली होती. तथापि अपिलार्थी पारंपारीक वीज जोडणीचा हट्ट सोडण्यास तयार नव्हते. त्यामुळे वीज जोडणी पुर्ववत न होण्यास सर्वस्वी अपिलार्थीच जबाबदार आहेत. त्यास महावितरण जबाबदार राहणार नाहीत हे अपिलार्थीस दिनांक २४ मार्च २०२६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. परंतू त्यानंतर अपिलार्थीस पुन्हा समजूत काढून दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी वीज जोडणी स्मार्ट मीटरसह करून देण्यात आली. म्हणून अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक १८ मार्च २०२६ ते दिनांक ७ एप्रिल २०२६ या कालावधीसाठी वीज जोडणी न मिळण्यास अपिलार्थी स्वतः जबाबदार आहेत.

- **स्मार्ट मीटर बाबत**
- महाराष्ट्र वीज नियामक आयोग (वीज पुरवठा संहिता वितरण परवाना धारकाच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी) विनियम २०२१ (कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनियम २०२१) च्या कलम २.२(एस एस) चा दाखला देण्यात आला तो खालीलप्रमाणे.

  *""**स्मार्ट मीटर**" चा अर्थ केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे आणि त्याचे संचालन) विनियम २००६ च्या विनियम २(१)(टिए) मध्ये देण्यात आलेल्या अर्थाप्रमाणे आणि त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार राहील."*
- कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनियम २०२१ च्या कलम १५.१.१ चा दाखला देण्यात आला तो खालीलप्रमाणे.

  "सर्व जोडण्या उचित मीटरसह मंजूर करण्यात येतील. सर्व मीटर्स, वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे आणि प्रचालन) विनियम २००६ मध्ये निर्गमित केलेल्या विविध विनियमांमध्ये ठरवून देण्यात आलेल्या आवश्यकतांशी सुसंगत असतील. वितरण परवानाधारक नवीन जोडणी भारांकित करण्यासाठी किंवा मीटर बदलण्यासाठी किंवा उर्जेचे लेखापरीक्षण आणि इंटरफेस मीटरसारख्या अन्य प्रयोजनांसाठी देखील वर उल्लेखित विनियमांचे पालन करील.

  परंतू असे की, सर्व नवीन जोडण्या दूर अंतरावरून मीटरमधील नोंदी घेण्याची किमान सुविधा असणाऱ्या स्मार्ट मीटर किंवा मीटरसह देण्यात येतील.

  परंतू आणखी असे की, सर्व विद्यमान मीटर्स जेव्हा बदलण्यात येतील तेव्हा दूर अंतरावरून मीटरमधील नोंदी घेण्याची किमान सुविधा असणाऱ्या स्मार्ट मीटर किंवा मीटरनेच केवळ बदलण्यात येतील."

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

या करीता वीज मीटर बदलणे हे कायदेशीर असून बंधनकारक आहे. तसेच भारत सरकारचे राजपत्र दिनांक १७ ऑगष्ट २०२१ G.S.R. 23.352/2019-R-R मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

In pursuance to the provisions made in clause 4(1) (b) of the Central Electricity Authority (Installation and Operation of Meters) Regulations, 2019 framed under sub-section (1) of section 55 read with clause (c) of sub-section (2) of section 177 of Electricity Act 2003 (36 of 2003), the Central Electricity Authority hereby notifies the following timelines for the replacement of existing meters with smart meters with prepayment feature:

All consumers (other than agricultural consumers) in areas with communication networks shall be supplied electricity with smart meter working in prepayment mode, conforming to relevant IS within the timelines specified below:

(i) All Union Territories, electrical divisions having more than 50% consumers in urban areas with AT & C losses more than 15% in financial year 2019-20 and all other electrical divisions with AT &C losses more than 25% in finnancial year 2019-20, all Government offices at Block level and above, and all industrial and commercial consumers, shall be metered with smart meter with prepayment mode by December, 2023.

Provided that the State Regulatory Commission may be notification, extend the said period of implementation, giving reason to do so, only twice but not more than six months at a time, for class or classes of consumers or for such areas as may be specified in that notification

(ii) All other areas shall be metered with smart meters with prepayment mode by March 2025, provided that in areas which do not have communication network, installation of Prepayment meters, confirming to relevant IS, may be allowed by the respective State Electricity Regulatory Commission.

(iii) All consumer connection having current carrying capacity beyond that specified in relevant IS may be provided with meters with smart meter having AMR facility.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

म्हणजेच महावितरणकडून येत असलेले मीटर हे Central electricity regulation amendment F.1/12/CEA/DPM/Regulations/2025 (installation and operation of meter) प्रमाणे कायदयात अधीन राहून निर्गमीत करण्यात आलेल्या नियमानुसार बदलण्यात येत असल्याने मीटर बदलणे कायदयानुसार बंधनकारक आहे. तसेच सदर प्रकरणामध्ये एमओपी अधिसूचना दिनांक २३ मे २०२२ F.No.23/35/2019-R&R खालीलप्रमाणे.

"F.No.23/35/2019-R&R – In pursuance to the provisions made in clause 4(1) (b) of the Central Electricity Authority (Installation and Operation of Meters) (Amendment) Regulations, 2019, amendment from time to time, framed under sub-section (1) of section 55 read with clause (c) of sub-section (2) of section 177 of the Electricity Act, 2003 the Central Government notified the timelines for replacement of existing meters with smart meters with prepayment feature, vide notification no.23/35/2019-R&R published in the Gazette of India on 17th August 2021.

2. In supersession of the notification dated 17th August 2021, the following timelines are hereby notified: -

2.1 All consumers (other than agricultural consumers) in areas with communication network, shall be supplied electricity with Smart Meter working in prepayment mode, conforming to relevant IS, within the timelines specified below:

All Union Territories, all electrical divisions with high AT & C Loss (Urban Areas with AT&C loss >15% and rural areas with AT & C loss >25%) Industrial and Commercial consumers, all Government offices at Block level and above, shall be metered with smart meters, with prepayment mode by 31st December 2023.

Provided that these areas shall also be covered for smart Distribution Transformer (DT) metering by the Advanced Metering Infrastructure Service Provider (AMISP), on a priority basis, by 31st March 2023;

Provided also that the State Regulatory Commission may, by notification, extend the said period of implementation giving reason to do so, only twice but not more than six months at a time, for a class or classes of consumers or for such areas as may be specified in that notification"

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

(iii) All other areas shall be metered with smart meters, with prepayment mode by 31st March 2005"

नवीन स्मार्ट मीटर वीज जोडणी आक्षेप हा वस्तुस्थितीला विपरीत असून सदरचो कृती हो अपिलार्थीने स्वतःहून ओढवून घेतलेली आहे. कायदयाचा चुकीचा अर्थ लावण्यावर आधारीत आहे. अपिलार्थीने दिनांक २५ मार्च २०२६ रोजी मंचाकडे अभिवेदन दाखल केले. मंचाने प्रतिवादींना ५६(१) ची नोटीस न देता वीज पुरवठा बंद केल्याकारणाने रक्कम रु.५०००/- दंड मा. आयोगाकडे जमा करावेत असे निर्देश दिले. सदरहू रक्कमेचा भरणा माननीय आयोगाकडे करण्यात आला.

- वरील सर्व बाबींचा विचार करता -अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १७ जुलै २०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी अनिल दत्तात्रय अंदे, राहणार सर्व्हे नं ११०३/११०४ भवानी पेठ, अंदे वाडा, पुणे (ग्राहक क्रं.१७००११९६४१७९) महावितरणचे दिनांक १ जानेवारी १९७९ पासून घरगुती वीज ग्राहक आहेत.
- अपिलार्थीच्या मार्च २०२६ महिन्याच्या वीज देयक भरणा करण्याची अंतिम मुदत २ एप्रिल २०२६ असताना प्रतिवादी महावितरणकडून अपिलार्थीस कोणतीही पुर्वकल्पना न देता वा वीज कायदा २००३ च्या कलम ५६(१) नुसार तसेच कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी विनियम २०२१ च्या कलम १५.२.५. नुसार वीज जोडणी खंडीत करण्यापुर्वी नोटीस देणे बंधनकारक असताना ती न देता रु.९४०/- ची थकबाकी अभावी त्यांचा वीज पुरवठा दिनांक १८ मार्च २०२६ रोजी खंडीत करण्यात आला व मीटर काढून नेण्यात आला.
- मीटर काढताना कोणताही पंचनामा न करता, तसेच अपिलार्थीची सही किंवा त्यांची सहमती घेण्यात आलेली नाही.
- अतिरीक्त कार्यकारी अभियंता यांचे दिनांक २४ मार्च २०२६ चे संदर्भीय पत्रांत विहित मुदत दिनांक व एसएमएस नोटीस याबाबत परस्परविरोधी माहिती देण्यात आलेली आहे. पत्रात विहित मुदत दिनांक २ मार्च २०२६ नमुद करण्यात आली, तर प्रत्यक्ष वीज देयकानुसार फेब्रुवारी २०२६ च्या वीज

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

देयकाची विहित मुदत दिनांक ५ मार्च २०२६ व मार्च २०२६ च्या वीज देयकाची विहित मुदत दिनांक २ एप्रिल २०२६ अशी होतो (तक्ता १).

- अतिरीक्त कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक ६ एप्रिल २०२६ च्या पत्रामध्ये थकबाकी असल्याचा आधार घेण्यात आला. परंतू विहित मुदत दिनांक ५ मार्च २०२६ असताना वीज पुरवठा खंडीत तारीख ही दिनांक १८ मार्च २०२६ ही आहे. यावरून कथित थकबाकी या प्रकरणी लागू होत नाही. वीज कायदा २००३ च्या कलम ५६(१) ची नोटीस दिनांक २० मार्च २०२६ पर्यंत लागू होती तरी सुध्दा वीज पुरवठा बंद करण्यात आला.
- दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ च्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावून स्मार्ट मीटर शिवाय वीज नाही अशी बेकायदेशीर अट लावण्यात आली. सदर आदेश हा स्मार्ट मीटर इन्स्टॉलेशन संदर्भातील प्रशासकीय मार्गदर्शक असून तो स्मार्ट मीटर शिवाय वीज पुर्नजोडणी नाकारण्याचा अधिकार देत नाही. सदर आदेश वीज कायदा २००३ वा वीज नियामक आयोगाच्या कोणत्याही विनियमापेक्षा मोठा नाही. त्यामुळे सदर आदेशाचा आधार घेऊन पुर्नवीजजोडणी नाकारणे कायदाबाह्य आहे.
- वीज कायदा २००३ च्या कलम ४३ नुसार वितरण परवानाधारकावर वीज पुरवठा उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. स्मार्ट मीटर स्वीकारला नाही म्हणून वीज पुरवठा नाकारणे हे विरोधाभासी आहे. स्मार्ट मीटर शिवाय वीज जोडणी नाकारणे हे कोणत्याही कायदयात, विद्युत अधिनियम किंवा वीज नियामक आयोगाच्या कोणत्याही विनियमात आढळत नाही. त्यामुळे अशी अट पुर्णपणे बेकायदेशीर आहे.
- महावितरणचा दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ चा आदेश हा प्रशासकीय स्वरूपाचा आदेश आहे. तो वीज कायदा २००३ किंवा वीज नियामक आयोगाच्या विनियमापेक्षा वरीष्ठ असू शकत नाही. सदर आदेशाचा आधार घेऊन वीज पुर्नजोडणी नाकारणे हे बेकायदेशीर आहे.
- Principal of Proportionality च उल्लंघन अत्यल्प रकमेच्या कथित थकबाकीच्या कारणावरून (थकीत नसताना) मीटर काढून वीज पुरवठा बंद ठेवणे अन्यायकारक कारवाई आहे. अपिलार्थीने वीज पुरवठा नाकारलेला नव्हता, फक्त पुर्वीचा पारंपारीक मीटर पुन्हा बसविण्याची मागणी केली होती. तथापि, अपिलार्थीवर स्मार्ट मीटरनेच वीज जोडणी घेण्याची सक्ती करण्यात आलो.
- दिनांक १८ मार्च २०२६ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत अपिलार्थीचा वीज पुरवठा बंद ठेवण्यात आल्यामुळे अपिलार्थीस व त्यांच्या कुटुंबास आर्थिक त्रास सहन करावा लागला. मंचाने त्यांच्या आदेशात वैध नोटीस नसल्याचे, बेकायदेशीर वीज खंडन झाल्याचे, स्मार्ट मीटर संबधी चुकीचा अर्थ

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

लावल्याचे, विरोधाभासी नोंदी असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे तरी त्या निष्कर्षाशी सुसंगत व परिणामकारक दिलासा दिलेला नाही. जुना मीटर पुर्नस्थापित करण्याबाबतचे आदेश दिलेले नाही. मानसिक, सामाजिक व आर्थिक त्रासाबाबत नुकसान भरपाई सुध्दा मंजूर केलेली नाही, स्मार्ट मीटर सक्तीच्या मुद्दयावर निष्कर्ष नोंदविलेला नाही.

- अपिलार्थीने दिनांक १० जून २०२६ रोजी माननीय विद्युत लोकपाल मुंबई कार्यालयात अभिवेदन दाखल करून खालील प्रमाणे मागण्या केल्या आहेत.
  - मंचाचा आदेश रद्द करण्यात यावा.
  - दिनांक १८ मार्च २०२६ रोजी केलेले वीज खंडन बेकायदेशीर घोषित करण्यात यावे.
  - स्मार्ट मीटर सक्ती व कंन्डीशनल रिकनेक्शन (Conditional Reconnection) ही कारवाई बेकायदेशीर घोषित करण्यात यावी.
  - अपिलार्थीचा पुर्वीचा पारंपारीक मीटर पुर्नस्थापित करण्याबाबत योग्य आदेश व्हावेत, अन्यथा स्मार्ट मीटर स्वीकृती ही स्वच्छेने नसून नाईलाजास्तव झालेली असल्याचे आदेशात नोंद व्हावे.
  - बेकायदेशीर वीज खंडन, मानसिक त्रास, सामाजिक मानहानी व मनमानी कारवाईबाबत योग्य नुकसान भरपाई देण्यात यावी.
  - सदर प्रकरणी सुमारे ४८० तास वीज पुरवठा खंडीत राहिल्यामुळे किमान रु.२४,०००/-, कृती मानके विनियमानुसार विहीत मुदतीत वीज पुरवठा पुर्ववत न केल्यामुळे रु.२४,०००/-, मानसिक त्रास, मनमानी कारवाई, दबावतंत्रामुळे झालेली नुकसान भरपाई म्हणून रु.५०,०००/- स्मार्ट मीटरची सक्ती केल्याबाबत रु.२५,०००/-, प्रशासकीय कारवाईमुळे झालेल्या सामाजिक व प्रतिष्ठत्मक हानीबद्दल नुकसान भरपाई म्हणून रु.२५,०००/- देण्यात यावे.

विश्लेषण व निर्णय

५. पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थी अनिल दत्तात्रय अंदे, हे महावितरणचे दिनांक १ जानेवारी १९७९ पासून घरगुती वीज ग्राहक आहेत. अपिलार्थीची वीज जोडणी थकीत वीज देयकाच्या कारणावरून दिनांक १८ मार्च २०२६ रोजी कोणतीही पुर्वसुचना न देता वा वीज कायदा २००३ व लागू नियमानुसार आवश्यक नोटीस न देता खंडीत करण्यात आली व मीटर काढून नेण्यात आला. मीटर काढताना कोणताही पंचनामा करण्यात आला नाही, तसेच अपिलार्थीची कुठेही सही किंवा संमती घेण्यात आली नाही. त्यामुळे मीटर काढण्याची कार्यवाही

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

चुकीची असल्याचे अपिलार्थीचे म्हणन आहे. अपिलार्थीने केवळ स्मार्ट मीटर ने वीज जोडणी नाकारली म्हणून त्याची वीज पुर्नजोडणी नाकारणे हे कायदेशीरदृष्टया ग्राह्य नसल्याचे अपिलार्थीचे म्हणने आहे. अल्प रकमेच्या थकबाकीच्या कारणावरून मीटर काढून अपिलार्थीस दिर्घकाळ वीजेपासून वंचित ठेवणे हे प्रमाणबध्दतेच्या तत्वास विरोधी व अन्यायकारक आहे. अपिलार्थीने वीज पुरवठा नाकारलेला नसून फक्त स्मार्ट मीटर ऐवजी पारंपारीक मीटरने पुर्नजोडणी देण्याची मागणी केली होती. तसेच झालेलया आर्थिक व मानसिक त्रासापोटी योग्य ती नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

७. प्रतिवादी महावितरणने नमुद केले की अपिलार्थीची थकबाकी वीज देयकाची रक्कम न भरल्यामुळे दिनांक १८ मार्च २०२६ रोजी वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. थकबाकी भरल्यानंतर पुर्नजोडणीसाठी महावितरणचे कर्मचारी गेले असता अपिलार्थीने स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध करून वीज जोडणी घेण्यास नकार दिला, त्यामुळे वीज जोडणी न झाल्याची जबाबदारी अपिलार्थीचीच आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या संबधीत नियमांनुसार विद्यमान मीटर स्मार्ट मीटरमध्ये बदलणे कायदेशीर व बंधनकारक आहे. केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसारही विद्यमान मीटर स्मार्ट मीटरमध्ये बदलण्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे महावितरणची मीटर बदलण्याची कार्यवाही कायदेशीर आहे. अपिलार्थीचा स्मार्ट मीटरला केलेला आक्षेप वस्तुस्थिती व कायदेशीर तरतुदींविरूध्द असून, तक्रार निराधार असल्याने ती फेटाळण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केली.

८. अपिलार्थीने फेब्रुवारी २०२० महिन्याचे रू.४४४/- चे थकीत वीज देयक भरणा करण्याची अंतिम मुदत दिनांक ५ मार्च २०२६ होती. मात्र देय रक्कमेचा भरणा न केल्याने सिस्टीमद्वारे नोंदणीकृत मोबाईलवर रू. ४४४/- चे थकबाकीचा भरणा करण्याची कलम ५६(१) नुसार नोटीस पाठविण्यात आली. साधारणतः नोटीसीची मुदत १५ दिवस असते. म्हणजे ग्राहकास रक्कम भरण्यासाठी २० मार्च २०२६ पर्यंत मुदत उपलब्ध होती. तरीही रक्कम न भरल्यामुळे दिनांक १८ मार्च २०२६ रोजी वीज पुरवठा खंडीत करण्यात आला. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक १८ मार्च २०२६ रोजी एकुण रू.९४०/- चा भरणा केला.

अपिलार्थीने थकीत वीज देयकाचा भरणा केल्यानंतरही स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध करून पुर्नजोडणी नाकारली. महावितरणने पुर्नजोडणीसाठी दोन वेळा प्रयत्न करूनही अपिलार्थीने सहकार्य केले नाही. त्यामुळे दिनांक १८ मार्च २०२६ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत अपिलार्थीस वीज पुरवठा न मिळण्यास अपिलार्थी स्वतः जबाबदार आहेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

९. प्रतिवादीने भारत सरकारच्या उर्जा मंत्रालयाच्या दिनांक १७ ऑगष्ट २०२१ च्या अधिसुचना तसेच Revamped Distribution Sector Scheme (RDSS) अंतर्गत जारी निर्देशांचा आधार घेत राज्यातील विद्यमान व नवीन वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. स्मार्ट मीटर बसविणे ही शासनाच्या धोरणानुसार व नियामक तरतुदींनुसार करण्यात येणारी कार्यवाही असल्याचे प्रतिवादीने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१ मधील विनियम १५ मध्ये मीटर बाबतचे धोरण स्पष्ट केले आहे.

१०. दोन्ही पक्षकारांनी सादर केलेले कागदपत्रे व त्यांनी केलेले युक्तीवाद तसेच लागू असलेल्या अधिसूचना व नियमांचा विचार करता 'स्मार्ट मीटर बसविणे' हे शासन व नियामक प्रधिकरणांच्या निर्देशानुसार करण्यात येत असून ग्राहकास पारंपारीक मीटरची निवड करावयाचे स्वातंत्र या बाबत कोणतीही तरतुद असल्याचे निदर्शनास आल नाही. वीज जोडणीसाठी प्रतिवादीने आवश्यक पायाभूत सुविधा उभारुन वीज जोडणी देण्याची तयारी पुर्ण केली होती, मात्र स्मार्ट मीटर बसविण्यास अपिलार्थीनेच विरोध केल्यामुळे वीज जोडणी प्रलंबित राहीली आहे, त्यामुळे केवळ प्रतिवादीस जबाबदार धरता येणार नाही. अपिलार्थीने थकबाकीचा भरणा केल्यानंतर वीज जोडणी देण्याची प्रक्रिया प्रतिवादीकडून पुर्ण करण्यात आली, परंतु, 'स्मार्ट मीटर' बसविणेस अपिलार्थीने विरोध केला त्यामुळे सदर प्रक्रिया प्रलंबित राहिली. त्यामुळे अपिलार्थीस झालेला मानसीक त्रास व आर्थिक नुकसान भरपाईस अपिलार्थी स्वतः जबाबदार असल्याचे निदर्शनास येते.

अपिलार्थीच्या ग्राहक खात्यावर रु.५५३/- इतकी सुरक्षा ठेव जमा आहे. अपिलार्थीच्या ग्राहक CPL नुसार २०२५-२६ मधील वीज वापर व बिलिंगच्या तपशीलानुसार, प्रतिवादीने २०२५-२६ मध्ये ६६३/- इतक्या अतिरीक्त सुरक्षा ठेवीची मागणी (सुमारे दोन महिन्याच्या सरासरी वीज देयकाच्या समतुल्य नुसार) केली. तथापि अपिलार्थीने अतिरीक्त सुरक्षा ठेव जमा केलेली नाही.

११. वरील सर्व मुद्यांचा उहापोह केल्यावर दिसते की, एका मुद्यावर अपिलार्थीवर अन्याय झालेला आहे, म्हणजे दिनांक ५ मार्च २०२६ च्या नोटीसची अतिंम तारखेपर्यत वाट न बघता २ दिवसापुर्वीच वीज पुरवठा खंडति करणे. त्याबाबीसाठी प्रतिवादी यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी अपिलार्थीस रु.५००/- नुकसान भरपाई देण्यात यावी.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

१२.   आदेशाचा अनुपालन अहवाल या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीच्या इतर मागण्या फेटाळण्यात येत आहेत.

१३.   अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वंदना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai